# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २८४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०६/२०१८

**१) ट्रॅक्टरची चोरी :—**

दिनांक ०३/०६/२०१८ चे २३.४५ वाजता ते ०४/०६/२०१८ चे ०५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी उमराज रामचंद्र खोब्रागडे वय ५० वर्ष, रा. आंबेडकर वार्ड देव्हाळी याचे घरा समोर ठेवलेला स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ३२८८ किंमती १,७५,०००/—रु. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) आदेशांचे उल्लघंन करुन बिनपरवानगीने मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०४/०६/२०१८ चे १५.०५ वाजता दरम्यान यातील आरोपी यास मा.उपविभागय दंडाधिकारी सा. साकोली यांचे कार्यालयीन आदेश क्र. ०२/२०१८ क. ५६(अ)मपोका दिनांक १५/०५/२०१८ अन्वये भंडारा जिल्हयामधुन १ वर्षा करीता हद्दपार करण्यात आले. असतांना सुध्दा यातील आरोपीने सदर आदेशाचे उल्लघंन करुन जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचे कार्यालयात बिनपरवानगीने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. नंदनवार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १४२ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) धान खरेदी विक्री योजने अंतर्गत शासनाचे आर्थीक नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०४/०६/२०१८ चे १८.५३ वाजता दरम्यान यातील आदीवासी विकास महामंडळ राज्य शासनाचे वतीने भंडारा व नागपुर जिल्हयात धान खरेदी योजना राबवीत असुन आरोपी क्र. १ ते २४ यांनी शासकीय योजने नुसार खरीप पनन हंगाम सन २००९/२०१० ते २११२—२०१३ मध्ये आदीवासी शेतक—यां कडुन प्राप्त केलेला धान भरपाई करुन नियमानुसार निश्चीत केलेल्या प्रमाणात भरपाई झालेला तांदुळ संबधीत विभागाकडे जमा न करता शासनाचे १५,५१,८६,४७९/—रु. चे आर्थीक नुकसान केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४०३,४०७,४०९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा श्री. जोगदंड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) लाच रक्कम स्विकारल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०४/०६/२०१८ चे ११.५५ यातील नमुद आरोपी क्र. १ ते ३ यांनी तक्रारी श्री. हुसेन कुमार रंगारी यांना त्यांचे मालकी जागेसह कृषी केन्द्र लावण्यासाठी ग्रा. पं. मांगली येथुन नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता ५,०००/—रु. ची मांगणी करुन ती लाच रक्कम आरोपी क्र. ४ राजकुमार उमराव वाघाडे ग्रा.पं. चपराशी यांचे वतीने स्विकारल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. पारधी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ७,१२,१३(१)(ड),१३(२)ला. प्र. का. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. पारधी एसीबी भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) गळफास लावुन युवकांचा मृत्यु :—**

दिनांक ०४/०६/२०१८ चे १३.२५ वाजता पुर्वी यातील मृतक गौरव मिलींद रामटेके वय २२ वर्ष, रा. इंदीरा आवास शास्त्री वार्ड वरठी याने स्वत:चे राहते घरी वरचे सिलींगचे स्लॅपचे लोखंडी कडीला कापडी दोरीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी पवन श्रावण रामटेके वय ४० वर्ष, रा. आंबेडकर वार्ड वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**६) विहरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु :—**

दिनांक ०४/०६/२०१८ चे ०५.०० ते १३.३० वाजता दरम्यान यातील मृतक भाऊलाला भोलाराम लांजेवार वय ३९ वर्ष, रा. गांधी वार्ड एकलारी हा घरी कोणाला काही न सांगता घरुन निघुन गेला व त्याची प्रकृती बरी नसल्याने आजाराला कंटाळुन विहीरीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी देवीलाल भोलाराम लांजेवार वय ४३ वर्ष, रा. सिरसी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**८) अवैध हातभट्टी,देशी दारु / जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०४/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, आंधळगाव, गोबरवाही, व लाखनी येथे हातभट्टी दारु अडड्यावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४६ लिटर हातभट्टी किंमती २६००/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०४/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०७, तीन सिटर वाहनाकरीता– ०९ ईतर वाहनांवरती – ८५ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.